Vol 5 Issue 3 Dec 2015

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 3 | Dec - 2015

Review Of Research

# उत्तर वैदिक कालीन स्त्री जीवनाचे चिकित्सक अध्ययन

डॉ. ज्ञानेश्वर शामराव कडव
इतिहास विभाग प्रमुख ,
ज. मु. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा.

**सार :–**
स्त्री व पुरूष मानवी जीवनाच्या दोन परस्पर पूरक बाजू आहेत. अति प्राचिन काळापासून दोघांचेही अस्तित्व कायम असले तरी स्त्री व पुरूष यांच्यात अधिकार, जबाबदारी, कार्य, स्वांतत्र्य, प्रतिष्ठा, सन्मान याबाबतीत समानता, एकसारखेपणा कधीच नव्हता. पूर्व वैदिक काळात मातृसत्ताक पध्दती अस्तित्वात होती. स्त्रियांना पुरूषांप्रमाणे सर्व अधिकार व स्वातंत्र्य प्राप्त होते. किंचीत प्रमाणात कां होईना पण स्त्रीयांना पुरूषापेक्षा समाजात, कुटुंबात व इतरही क्षेत्रात अधिक आदर व सन्मान होता. पण उत्तर वैदिक काळात स्त्रीयांचा प्रभाव, दर्जा, अधिकार यांचा लोपच झाला नाही तर स्त्री जीवनावर नानाविध बंधने लादली गेली. स्त्री स्वातंत्र्याचा संकोचझालाच पण सतिप्रथा, बालविवाह, बालहत्या या सारख्या अनेक वाईट प्रथा व चालिरिती अस्तित्वात आल्या. स्त्री उपभोगाचे व उत्पादनाचे साधन मानल्या जाऊ लागले. याची चिकित्सा करण्याच्या उद्देशाने हा शोधप्रबंध सादर होत आहे.



**विवेचन :–**
पुरूषप्रधान समाजव्यवस्था स्थिरावण्यापूर्वी मातृसत्ताक पध्दतीचा अवलंब करणारी समाजव्यवस्था ऋग्वेद पूर्वकाळात होती आणि स्वाभाविकपणे त्या व्यवस्थेमध्ये स्त्रीयांना नंतरच्या काळापेक्षा अधिक स्वातंत्र्य होते.[1]
प्रभाकर देवऱ्यांनी म्हटल्याप्रमाणे, ''उत्तर वैदिक काळात आर्य संस्कृतीचा विस्तार घडून आला. ही संस्कृती, बिहारपर्यंत विध्य पर्वताच्या उत्तरेच्या प्रदेशात पसरली. मुख्यतः गंगा नदीच्या खोऱ्यातील विस्तीर्ण भू–भाग तिने व्यापला. पशुपालना बरोबर हळूहळू शेती हा उपजिविकेचा महत्वाचा व्यवसाय होऊ लागला. टोळयाचे भटके जीवन संपून विशिष्ट टोळया स्थायी झाल्या. प्राचीन भारतातील पहिली राजकीय संरचना या वेळी राज्यांच्या स्वरूपातली आहे.''[2] डी. डी. कोसांबी म्हणतात, ''संस्कृतीचा विस्तार मगधापर्यंत पोचल्यावर लोखंड उपलब्ध झाले. लोखंडी कुऱ्हाड आली. लोखंड उपलब्ध होताच मोठया प्रमाणवर शेती होवू लागली. अनेक नवे हस्तव्यवसाय, हुन्नर आणि कलानिर्माण झाल्या. नद्यांच्या काठावरील काही गावांना लहान, लहान नगराचे स्वरूप आले. व्यापार सूरू झाला. सगळयाच प्रकारचे दळणवळण वाढले. युध्दाची मुख्य शस्त्रे अजून धनुष्यबाण आणि गदा हिच होती तरीही तलवार आणि भाला ही नवी शस्त्रे अस्तित्वात आली.''[3]
तर ग. श्री. सरदेसाई लिहितात, ''समाजाच्या उत्पादन साधनात हे एक क्रांतिकारी संक्रमण होते. त्याचा पहिला परिणाम हा झाला की, एकंदर सामाजिक उत्पादन वाढले. ऋग्वेदकालीन वाङ्मयात येथून–तेथून 'गायी दे, संतती दे, अन्न दे सुदृढ प्रकृती दे' ही आराधना मागे पडली. आता परिस्थिती बदलली जीवणाच्या किमान गरजा भागून वरकड जीवनावश्यक वस्तू शिल्लक राहू लागल्या. त्याचा संचय कसा करावयाचा, कोणी करावयाचा, कोणासाठी करावयाचा हा मानवी इतिहासातील महान प्रश्न गणव्यवस्थेवर उभारलेल्या समाजासमोर उभा राहीला. त्याचे उत्तर त्यांनी वर्णव्यवस्थेत शोधले. गणव्यवस्थेचे विघटन आणि वर्गिय समाजाची उत्पत्ती होवून स्त्रीला उत्पादन कार्य व उत्पादन वितरणापासून वंचीत केल्या गेले.''[4] आर्यांच्या गणव्यवस्थेचे विघटंन होत असतांना त्याचबरोबर येथील इतर अनेक स्त्री सत्ताक मागासलेल्या गणराज्य टोळयांवर ते वर्चस्व प्रस्थापीत करीत होते. वर्चस्व कायमस्वरूपी टिकविण्याकरीता भारतीय स्त्रीला शुद्रांचा दर्जा देण्यात आला. त्यांना ज्ञान व संपत्तीपासून वंचीत ठेवण्यात येवू लागले. आरंभी वस्ती करतांना तेथे पूर्वीचे कोणी मानवी समुह असतील तर त्यांना जिंकून दास केले जात असे, त्यात आर्य अनार्य असा भेद नव्हता कारण ऋग्वेदातच आम्हाला शत्रुंचे दास होण्यापासून वाचव अशा प्रार्थना करण्यात आलेल्या आहेत.

गुलामाकडून शेतीची व इतर मेहनतीची कामं करून घेऊ लागले याचा परिणाम म्हणून स्त्रीयांची घरकामात रवानगी झाली. स्त्री इथूनच 'चूल आणि मुल' मध्ये अडकवली गेली. तरी ही कष्टकरी वर्गातील स्त्रीया, शेतीत राबत होत्याच. या स्त्रीयांना तर वरच्या वर्गातील स्त्रीयांच्या तान्हया मुलांना दूध पाजण्याचं ही काम करावं लागत असे, असेही पुरावे सापडतात. तात्पर्य काय वरच्या जातीवर्गातील स्त्रीयांचा वापर उपभोग्य वस्तु सारखा आणि मुलांची पैदास करणाऱ्या टांकसाळी सारखा केला गेला. तर कष्टकरी स्त्रीयांना बाईपणा नाकारून, ढोर मेहनती साठी जुंपल गेल.[5]

प्रारंभी जेव्हा स्त्रीयाच मुख्यतः शेती करीत, तेव्हा पुरूष अनेक स्त्रीयांशी संबंध ठेवून आपली मालमत्ता वाढवित असत. पुढे मुलं, मजूर ही सुध्दा मालमत्ताच आहे अशी जाणीव होवून जितकी मुलं जास्त तितकी संपत्ती जास्त अशा विचाराने स्त्रीयांना मुलं जन्माला घालण्याच्या कामाला जुपंल गेल. जमीन व स्त्री यांच्यातील बिज धारण व नव निर्मीतीच्या शक्तीमधील साम्यामुळे क्षेत्र (शेत) हा शब्द नंतर स्त्री साठीही योजण्यात आलेला दिसतो. प्राण्यांच्या वर्तणुकीतून पुरूषांना अपत्य निर्मितीतला आपला सहभाग कळताच स्त्री विषयीचा आदर, उरारा, भिती या भावना लुप्त होऊन पुरूषांमध्ये वर्चस्वाची भावना निर्माण झाली. ''अन्नधान्याच्या साठयाप्रमाणेच गर्भधारणेची क्षमता असलेल्या स्त्रीयांच संपत्तीत रूपांतर होऊ शकल्या. प्रारंभीच्या काळात अशा विविध मार्गांनी स्त्रीला दुय्यम केले गेले. पुढ हे ऐतिहासिक कार्य कुटुंब संस्थेने इमानेइतबारे पार पाडले. यावर बहुतेक विचारवंताचे एकमत दिसते.

एंगल्स म्हणतात, ''प्रारंभी जेव्हा सर्व जोडपी एकत्र राहत असत, तेव्हाही स्त्रीया 'घरकाम' करीत. पण त्या कामाचं स्वरूप वेगळं होत. समाजाची गरज भगवणाऱ्या सार्वजनिक उद्योगाचं ते स्वरूप होते. मात्र अशी जोडप्यांची कुटुंबव्यवस्था तयार झाली तशी घरकाम एक खाजगी सेवा बनली. आपली मालमत्ता आपल्या जैव वारसाकडं जावी, याकरीता स्त्रीयांवर सर्व तऱ्हेची लैंगिक, आर्थिक, सामाजिक बंधने घातली गेली. खजगी मालमत्ता हेच स्त्रीच्या गुलामगीरीचे खरं कारण म्हणावे लागेल.''[6]

जुनी गृही व्यवस्था मोडकळीस येवून आईवडील व मुले एकत्र राहणारी स्वतंत्र कुटुंबे तयार झाली. स्त्री घराशी बांधली गेली आणि संपत्तीच्या उत्पादनात सहभागी होण्यापासून वंचित केली गेली. (भारतात बऱ्याच ठिकाणी आजच्या काळातही स्त्रीला नांगराला किंवा भांडी तयार करण्याच्या चाकाला स्पर्श करून देत नाहीत.) ओमप्रकाश लिहितात, '' सामुदायीक मालमत्ता जावून व्यक्तीगत मालमत्ता आल्याने पुरूष मालमत्तेचा धनी बनू लागला होता. आणि त्याला असे वाटत होते की, त्याच्या मालमत्तेचा त्याच्याच मुलांना वारसा मिळावा. आणि त्याच्या पत्नीला दुसऱ्या कोणापासून संतती होण्याची संधी मिळू नये. तिची सर्व मुले आपलीच आहेत याची त्याला हमी पाहिजे होती. म्हणून स्त्रीया पूर्णपणे घराच्या चार भिंतीमध्ये कोंडल्या गेल्या. त्यांना कोण्याही परपुरूषांना भेटण्याची संधी देण्यात येत नसे. उत्पादन वाढवायला अधिक पुरूषांची आवश्यकता होती. त्यामुळे पुत्रांचे महत्व वाढले. जेव्हा पुत्र जन्माला येई तेव्हा भावी काळातील एक संभाव्य कामकरी निर्माण झाला. या भानेतून पुत्रजन्मोत्सव साजरा केला जात असे. ऋग्वेद व अर्थवेद यांतील ऋषींनी 'आपल्याला कन्या व्हावी' अशी इच्छा एकदाही व्यक्त केलेली नाही. उलट 'पुत्र व्हावा' अशी इच्छा मात्र अत्यंत उत्कंटतेने आणि वारंवार व्यक्त केलेली आहे. ऋग्वेदातील विवाहसूकतांत म्हण्टले आहे की, 'या नववधुच्या ठिकाणी दहा पुत्र उत्पन्न व्हावेत व हिचा पती घरातील अकरावा पुरूष असावा' अशी प्रार्थना केलेली आहे. अर्थवेदाने 'आमच्या घरात पुत्र निर्माण व्हावेत आणि इतरांच्या घरात कन्या निर्माण व्हाव्यात अशी प्रार्थना केलेली आहे.''[7] या काळी एक पती–पत्नीत्व प्रणीत लग्नसंस्थेचा विचार उगम पावला. परंतु व्यवहारात मात्र स्त्रियांच्याच बाबतीत एक पतिव्रत होते. पुरूषांनी पाहिजेत तेवढी लग्ने करण्याचे व रखेल्या ठेवण्याचे हक्क स्वतःसाठी सुरक्षीत ठेवले.

पुरूष स्त्रीच्या टोळीत वा वस्तीत जाण्याऐवजी तिला आपल्या वस्तीत ओढून आणू लागला. या नंतरच्या काळामध्ये लग्नसंस्था अधिकाधिक कडक झाली. आज आपल्याला माहित असलेली लग्नसंस्था अनेक प्रयोगानंतर व संघर्षानंतर अस्तित्वात आली. जुन्या हिंदू धर्मग्रंथात आपल्याला विवाहांचे अनेक प्रकार आढळतात. हे लग्नसंस्थेच्या उत्क्रांतीतील निरनिराळे प्रयोग आहेत.

सिंधु शेळके यांच्या मता नुसार, '' मार्गन या शास्त्रज्ञाने विकासवादी सिध्दांत मांडला. त्यांच्या मते विवाह संस्थेला आरंभी अस्तित्व नव्हते. स्त्री–पुरुष संबंधावर कोणतेही नियंत्रण नव्हते. बॅकोफेन याने कल्पीलेल्या विवाहाच्या चार अवस्था (स्वैर अवस्था, बहुपती विवाह, बहुपत्नी विवाह, एक पत्नी विवाह) मार्गनच्या विवाह विषयक सिध्दांताशी जुळणारे आहेत.''[8] आता मुलांचे वंश आईवरून नव्हे तर वडीलांवरून ओळखले जात. कुटुंबातील मातृसत्ताक पध्दतीची जागा पितृसत्ताक पध्दतीने घेतली. वर्ग भेदाबरोबर राज्यसंस्था निर्माण होते. हा साऱ्याच देशांचा अनुभव आहे. कुटुंब, कुल, गोत्र, ग्राम, विष, जन, हे राज्य व्यवस्थेचे विकास क्रमातील टप्पे आहेत. आपल्याकडे गणसंस्थेच्या विघटनातून वर्गभेद मुख्यतः चातुव्रर्ण्याच्या स्वरूपात निर्माण झाले. ग्रीस, रोम प्रमाणे गुलाम आणि त्यांचे मालक या स्वरूपात झाले नाहीत. स्त्रीला गुलामापेक्षाही खालचा शूद्राचा दर्जा दिलेला होता. उपनिषदांचा काळ हा चातुवर्ण आणि राज्यसंस्था प्रस्थापित होण्याचा काळ होता.[9]

स्त्री जातीला वंचीत ठेवण्यात अर्थिक व राजकीय सत्ता पुरी पडत नाही. त्याला वैचारीक आधार देणे महत्वाचे असते, हे काम पुढे ग्रीक तत्वज्ञ, ॲरिस्टॉटल प्रमाणे मनुस्मृतीने केले. मनुस्मृती ही ऋग्वेदाच्या अखेरच्या काळापासून भारतीय समाजात विकसीत होत जाणाऱ्या चातुवर्ण व्यवस्थेची वैचारिक निर्मिती होती. स्त्री जन्माला येत नसते तिला 'स्त्री' म्हणून घडवलं जाते.[10]

या प्रमाणे एका बाजूला पुरूषाकडून स्त्रीच्या होणाऱ्या शोषणाला आणि दुसऱ्या बाजुला पुरूषांकडून पुरूषांच्या होणाऱ्या शोषणाला खाजगी मालमत्ता जवाबदार ठरली. मातृसत्ताकचे महत्व नष्ट करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून पुढे एका पाठोपाठ बालविवाह, बहु पत्नीकत्व, विधवांना दिली जाणारी अमानुष वागणुक आणि सतीची चाल या सर्व गोष्टी या दृष्टीने उद्‌बोधक आहेत. समाजाचा पहिला शोषीत भाग स्त्रियांचा होता.

### *निष्कर्ष :–*

अशाप्रकारे बदललेल्या राजकीय, आर्थिक, परिस्थितीचा परिणाम म्हणून उत्तर वैदिक कालखंडात स्त्री प्रधान कुटुंब व्यवस्थेऐवजी पुरूष प्रधान अर्थात मातृसत्ताक ऐवजी पितृसत्ताक व्यवस्था अस्तित्वात आली. पूर्व वैदिक काळात छोटी छोटी राज्य अस्तित्वात होती. हया राज्यांमध्ये सतत संघर्ष होत असत. या संघर्षामुळे पुरूष वर्गाला सैनिक या नात्याने सातत्याने घरापासून दुर जावे व राहावे लागत होते.

त्यामुळे कुटुंबाची जबाबदारी स्त्रीला पार पाडावी लागत होती. या महत्वपूर्ण जबाबदारी वहनामुळे स्त्रीयांना महत्व प्राप्त झाले होते. त्यांच्या सामाजिक स्तरात वाढ घडून आली होती. कार्याचे स्वातंत्र व ते कार्य पूर्ण करण्यासाठी अनिवार्यपणे लागणारे अधिकार स्त्रियांना प्राप्त झाले. स्त्रीच्या कार्यावर कुटुंब व समाजाचे भले अवलंबून असल्यामुळे स्त्रीयांना आदर व मान सन्मान दिल्या जात होता. यातूनच मातृसत्ताक पध्दती अस्तित्वात आली. त्या पध्दतीला सामाजिक व धार्मिक मान्यता प्राप्त होती.

पण उत्तर वैदिक काळात मोठया राज्याच्या निर्मितीमुळे संघर्षाचे प्रमाण कमी झाले. राजकिय स्थिरता, शांतता व सुरक्षितता बऱ्याच प्रमाणात अस्तित्वात आली. याचा परिणाम आर्थिक विकास होण्यातही झाला. उत्पादनाच्या तंत्रात व पध्दतीतही बदल झाले. पुरूष पूर्वीच्या तुलनेत कुटुंबात राहू लागला. कुटुंबाची जबाबदारी तो स्वतः पार पाडू लागला. त्यामुळे याबाबतीतील स्त्रीयांची जबाबदारी कमी झाली. जबाबदारी कमी झाल्यामुळे त्यांच्या अधिकारात व समाज प्रतिष्ठेतही घट आली. आर्थिक विकासामुळे पैसाही प्राप्त होऊ लागला. चैनी व विलासी जीवनाकडे कल वाढला. या जीवनाचे साधन म्हणून अर्थात उपभोगाचे साधन म्हणून स्त्रीयांकडे पाहिले जाऊ लागले. त्यातून स्त्रीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला. यासर्वांमुळे स्त्री जीवनावर नानाविध बंधने लादली जाऊ लागली. स्त्री स्वातंत्र्य व अधिकारांचा संकोच झाला. स्त्रीचे जीवन प्रामुख्याने पति व कुटुंबापूरतेच मर्यादीत बनले. यातून बहू पत्नीत्व, सति, बाल विवाह, बालहत्या, केशवपन या सारख्या अमानवीय प्रथा अस्तित्वात आल्या. त्यांना राजकिय, सामाजिक, धार्मिक मान्यता प्राप्त झाली. त्यामुळे स्त्री जीवन यंत्रवत बनले. याला काही अपवाद असले तरी स्त्रीयांचा छळ व शोषण हे उत्तर वैदिक कालीन समाज, धर्म व राजकिय व्यवस्थेचे वैशिष्टये होते. असेच म्हणावे व मानावे लागेल. हे सर्व प्रतिबिंबीत करण्याच्या उद्देशान सदर शोध निबंध सादर आहे.

### *संदर्भ सूचीः–*


1)र. ना. गायधीनी – प्राचीन भारतीय स्त्री जीवन – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, 2007, पृ. 4

2)प्रभाकर देव – प्राचीन भारत राजकिय स्थित्यंतरे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, 2002, पृ. 2

3)डी. डी. कोसांबी – भारतीय इतिहासाचा अभ्यास, पृ. 168

4)ग. श्री. देसाई – भारतीय तत्वज्ञान, दु. आ. लोकवाङ्‌मय गृह, मुंबई, 1997, पृ. 46

5)गणेश देशमुख – ग्रामिण समाज जीवन व साहित्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2008, पृ. 45

6)शिवराज गोर्ले – स्त्री विरूध्द पुरूष, राजहंस प्रकाशन, पुणे, 2007, पृ. 28

7)ओमप्रकाश – प्राचीन भारत का सामाजिक एव आर्थिक विकास, खंड 2, दिल्ली, 1986, पृ. 44

8)सिंधु शेळके – स्त्री काल आज उद्या, यशोदा प्रकाशन, अमरावती, पृ. 82

9)ग. श्री. देसाई – पूर्वउल्लेखित, पृ. 47

10)सिमोनद बोउवार– द सेंकड सेक्स (स्त्री : उपेक्षिता) अनु. डॉ. प्रभा खेतान, दिल्ली, 2002, पृ. 3.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org